## नियमित दिवाणी दावा क्र.५५/२०२२ मधील
## निशाणी ९ वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६, नियम ९ अन्वये दावा गट नं.४४५ चे संपूर्ण क्षेत्राची मोजणी होवून प्रतिवादी यांनी वादी यांचे मिळकतीवर अतिक्रमण केले असल्यास त्याबाबतचा सद्यस्थितीचा अहवाल व नकाशा सादर करणेसाठी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी या अर्जास हरकत घेतलेली आहे.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे मौजे उपळी, ता.वडवणी, जि.बीड येथील गट नं.४४५, क्षेत्र हे. ०६–२१ आर, पोटखराब १२ आर पैकी हे. ०१–९८ आर क्षेत्राची दावा मिळकत ही त्यांच्या मालकीची आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे या गटाचे मिळकतीतील सह–हिस्सेदार आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीचे मिळकतीमध्ये पूर्व व दक्षिण बाजूने प्रत्येकी ४० आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे. त्यामुळे, दावा गट नं.४४५ च्या संपूर्ण क्षेत्राची मोजणी होवून वादी यांच्या मालकीच्या वादग्रस्त हे. ०१–९८ आर क्षेत्राच्या हद्दी निश्चित होणेसाठी व प्रतिवादी यांनी त्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असल्यास ते अतिक्रमण कोणत्या दिशेकडून किती क्षेत्रामध्ये केले आहे, हे मोजमापासह स्पष्टपणे नकाशात दर्शवून अहवाल सादर करणेसाठी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती व्हावी, अशी विनंती वादी यांनी या अर्जाद्वारे केली आहे. प्रतिवादी यांनी अर्जास आक्षेप घेतला आहे. परंतु, वादी यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र सादर करून अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत.

५. उभय पक्षकारांनी केलेली कथने आणि अभिलेखातील निशाणी १२ वरील दावा मिळकत गट नं.४४५ चा ७/१२ उतारा यांचे एकत्रित अवलोकन केले असता वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ हे या मिळकतीतील सह–हिस्सेदार व लगत

कब्जेदार असल्याचे दिसून येते. वादी यांचे कथनांनुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये पूर्व व दक्षिण बाजूने प्रत्येकी ४० आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे. प्रतिवादी यांनी ती बाब नाकारली आहे. वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद पाहता या कामी दावा गट नं.४४५ चे संपूर्ण क्षेत्राची व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे नांवे असलेल्या क्षेत्रांची संयुक्त मोजणी होवून त्या गटातील वादी यांच्या मालकीचे वादग्रस्त हे. १–९८ आर क्षेत्राच्या हद्दी निश्चित होवून प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी यांचे मालकीचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले असल्यास त्यांनी कोणत्या दिशेकडून किती क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे, हे अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरूरीचे आहे. त्यामुळे, दावा मिळकतीची मोजणी करणेसाठी तज्ञ व्यक्ती म्हणून उप–अधीक्षक भूमी अभिलेख, वडवणी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणे योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :–

## आ दे श

१. वादी यांचा निशाणी ९ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. दावा मिळकत मौजे उपळी, ता.वडवणी, जि.बीड येथील गट नं.४४५, क्षेत्र हे. ०६–२१ आर, पोटखराब १२ आर या संपूर्ण क्षेत्राची व त्यामध्ये वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नांवे असलेल्या क्षेत्रांची संयुक्त मोजणी करून वादी यांच्या मालकीचे वादग्रस्त हे. १–९८ आर क्षेत्राच्या हद्दी निश्चित करणेसाठी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी यांचे मालकीचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले असल्यास ते अतिक्रमण कोणत्या दिशेकडून नेमके किती क्षेत्रामध्ये केले आहे, हे मोजमापासहीत नकाशामध्ये स्पष्टपणे दर्शविणेसाठी व तसा नकाशासहीत स्पष्ट टिपा नमूद करुन अहवाल सादर करणेसाठी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

३. या मोजणीचा संपूर्ण खर्च वादी यांनी करणेचा असून वादी यांनी नियमाप्रमाणे होणारी मोजणी फी उप–अधीक्षक भूमी अभिलेख, वडवणी यांचे कार्यालयात परस्पर भरणेची आहे.

४. वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची मोजणी होणेसाठी उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांना सर्वतोपरी सहकार्य करणेचे आहे.

५. उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांनी नियमांप्रमाणे मोजणीचे काम पूर्ण करुन पुढील नेमली तारीख २५ सप्टेंबर, २०२३ रोजी अगर तत्पूर्वी अहवाल व नकाशा सादर करावा.

६. न्यायालयीन आयुक्त उप–अधीक्षक, भूमी अभिलेख, वडवणी यांना नेमणूकीचे पत्र पाठविणेत यावे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.08.02 11:55:54 +0530

ठिकाण : वडवणी (डी.एम.हिंग्लजकर)
दिनांक : ०१.०८.२०२३ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, वडवणी,
ता.वडवणी, जि.बीड.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 01.08.2023 |
| Transcribed on | : | 01.08.2023 |
| Checked and signed on | : | 02.08.2023 |